# विठोबा पांचाळ

**विठोबा पांचाळ यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक प्रतिभासंपन्न, हरहुन्नरी आणि एकलव्याच्या जिद्दीने स्वतःच अनेक कला अवगत करणारा अवलिया हरपला आहे. महाराष्ट्राला चित्रकार तसेच शिल्पकारांची मोठी परंपरा आहे. पण शिल्पासाठी 'स्टेनलेस स्टील'सारखे अगदी वेगळे माध्यम वापरणारे पांचाळांसारखे विरळा. एकीकडे 'पूर्णवादा'चे वडिलांनी सांगितलेले तत्त्वज्ञान जगभरात रुजवणारे विष्णुमहाराज पारनेरकरांसारखे आध्यात्मिक गुरू तर दुसरीकडे फोटोग्राफी तसेच इतरही कामांच्या निमित्ताने सतत सहवासात असणारी डाव्या विचारांची मित्रमंडळी अशा दोन्हींचा मेळ राखणारे विठोबा पांचाळ हे अजब रसायन होते. मुळात लांज्याचे असणारे विठोबा मुंबईत आले आणि गणेशमूर्तींच्या निर्मितीत रमले. पण त्यानंतर अनेक नामांकित शिल्पकारांकडे उमेदवारी करून ब्राँझमधील शिल्पकला आत्मसात करून घेतली. या कलेचा पहिला आविष्कार गुरुचरणी अर्पण करावयाचा म्हणून मग विठोबांनी विष्णुमहाराजांचे वडील व गुरू रामचंद्रमहाराज यांचे पूर्णाकृती शिल्प बनविण्याची अनुमती गुरूंकडे मागितली. ते शिल्प केलेही. पण त्याच्या रचनेत काही कमतरता आहे, असे वाटल्याने विठोबांनी ते नव्याने खपून मनोजोगते बनविलेच. इथून पुढे त्यांनी अनेक शिल्पे साकारली. त्यातले, संसदेच्या प्रांगणातले कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांचे पूर्णाकृती शिल्प ही तर अजोड कलाकृती बनली आहे. याच वर्षी कवी केशवसुत यांच्या मालगुंड या जन्मगावी असणाऱ्या स्मारकात विठोबा यांच्या एका आगळ्या शिल्पाचे अनावरण झाले. हे शिल्प आहे, केशवसुतांच्या 'एक तुतारी द्या मज आणुनि' या कवितेच्या शताब्दीनिमित्त बनलेले. त्याचे माध्यम आहे, स्टेनलेस स्टील. खरेतर, स्टेनलेस स्टीलमध्ये ब्राँझसारखे कास्टिंग करणे दुरापास्त असते. त्यामुळे, असे शिल्प सांधणे अवघड. पण विठोबांनी पवईच्या 'लार्सन अँड टुब्रो'च्या संकुलातील स्टीलशिल्प पाहिल्यापासून हे माध्यम वापरण्याचा ध्यासच घेतला. तो केशवसुतांच्या साडेदहा फुटी ग्राफिक शैलीतील शिल्पात साकारला. हे शिल्प दीर्घायू व्हावे, यासाठी खास बनावटीचे स्टेनलेस स्टील वापरण्यात आले. 'तुतारी' कवितेचा सारा बंडखोर आशय या शिल्पाच्या रोमारोमात नेमका उतरला. विठोबांनी कॅमेरा हातात घेतला तेव्हा फोटो काढण्यापासून पूर्वीच्या काळातले ते रोल धुवून फायनल प्रिंट काढेपर्यंतची सांगोपांग कला आत्मसात केली. 'महाराष्ट्र फौंडेशन'च्या स्मरणिकेतील पुरस्कारविजेत्यांचे विठोबांनी काढलेले फोटो हे तिचे एक आकर्षणच होऊन बसले. एखाद्या लेखकाच्या घरातील खिडकीतून येणारी नेमकी प्रकाशतिरीप टिपण्यासाठी विठोबा तासन्तास**

वाट पाहात. पुन्हा पुन्हा त्याच्याकडे जात. ही फोटोग्राफीची साधना मग त्यांच्या ‘छायाचित्रणः यंत्र आणि तंत्र’ या पुस्तकातून शब्दांत उतरली. अंतर्यामी अत्यंत हळवा आणि पापभीरू असणारा हा कलावंत स्वतः कविताही करीत असे आणि चित्रांसाठी कधी कधी चारकोलचे माध्यमही वापरत असे. विठोबा पांचाळ यांच्यासारखा सर्जनाची अनेक माध्यमे सहजी हाताळणारा कलावंत फार दुर्मिळ असतो!